तंबाखू व दारु यांच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परीणामावर उपाय करणे आणि तंबाखु व दारु सेवन न करण्याबाबात जनजागृती करणे या करीता गडचिरोली जिल्ह्यासाठी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगटाची स्थापना करणे बाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांक : तंनिका २०१५ /प्र.क्र.४५५/आ-५

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
संकुल इमारत, १० वा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
तारीख: ४ जानेवारी, २०१६.

वाचा :

१) मुख्यमंत्री कार्यालयाचे क्र.मुमंस/प्रशासन कक्ष/३१/जावक क्र.१७०/२०१५, दि.२७ ऑगस्ट, २०१५ चे पत्र

प्रस्तावना :

महाराष्ट्र राज्यात गुटखा व सुंगधी तंबाखू बंदी लागु केली आहे. मात्र सर्च या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणामध्ये आजही तंबाखू व दारु चा वापर मोठया प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास आले आहे. तंबाखू व दारु सेवनामुळे सेवन करणाऱ्या नागरिकांच्या शरीरावर अनेक दुष्परीणाम होतात. यामुळे कर्त्या व्यक्तीचा मृत्यू, अपघात, उत्पादक शक्तीमध्ये हानी होणे. स्त्रीयांवरील अत्याचार व कर्करोगा सारखे प्राण घातक आाजार होतात. त्याच बरोबर आर्थिक शोषणसुध्दा होते. या करीता तंबाखू व दारु यांच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परीणामावर उपाय करणे आणि तंबाखू व दारु याचा वापर टाळण्यासाठी समाजामध्ये जनजागृती करणे, लोकांचा आर्थिक विकास, महिलांचे सबलीकरण करण्याकरीता राज्य स्तरावर मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षेतेखाली कार्यगटाची निर्मिती करणे व जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली अंमलबजावणी समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

तंबाखू व दारु यांच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परीणामावर उपाय करणे आणि तंबाखू व दारु याचा वापर टाळण्यासाठी समाजामध्ये जनजागृती करणे, लोकांचा आर्थिक विकास, महिलांचे सबलीकरण करण्याकरीता या शासन निर्णयाव्दारे राज्य स्तरावर मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे कार्यगटाची (Task Force) स्थापना करण्यात येत आहे.

१) मा.मुख्यमंत्री	- अध्यक्ष
२) डॉ. अभय बंग	- सल्लागार
३) मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य	- सदस्य
४) मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण	- सदस्य
५) मा.मंत्री, सामाजिक न्याय	- सदस्य
६) मा.मंत्री, महिला व बालविकास	- सदस्य
७) मा.मंत्री, आदिवासी विकास	- सदस्य
८) अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण	- सदस्य
९) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य	- सदस्य
१०) प्रधान सचिव, सामाजिक न्याय	- सदस्य
११) प्रधान सचिव, महिला व बाल विकास	- सदस्य
१२) सचिव, अदिवासी विकास	- सदस्य

वरील कार्यगटाने प्रथमत: गडचिरोली जिल्ह्यात पुढील तीन वर्षात तंबाखू व दारु बंदी प्रभावी पणे होण्यासाठी विविध उपाययोजनांची आखणी करुन जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय अंमलबजावणी समिती मार्फत त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. याकरीता जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे अंमलबजावणी समिती गठीत करण्यात येत आहे.

१. जिल्हाधिकारी	- अध्यक्ष
२. जिल्हा पोलिस अधिक्षक	- सदस्य
३. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद	- सदस्य
४. उपायुक्त, अन्न व औषध प्रशासन	- सदस्य
५. जिल्हा समाजकल्याण अधिकारी	- सदस्य
६. जिल्हा शल्य चिकित्सक	- सदस्य
७. जिल्हा आरोग्य अधिकारी	- सदस्य

८. जिल्हा वन अधिकारी - सदस्य
९. जिल्हा कृषी अधिकारी - सदस्य
१०. जिल्हा शिक्षण अधिकारी - सदस्य
११. तंबाखू व दारुबंदी या क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी(३) - सदस्य
१२. सर्च या संस्थेचे प्रतिनिधी - सदस्य

वरील समितीचे कार्य पुढील प्रमाणे राहतील

१) माहिती व जनजागृती करुन लोकांना तंबाखू व दारु सेवानापासून परावृत्त करणे
२) ग्राम समित्या व शहरांमध्ये वार्ड समित्यांची स्थापना करुन लोक सहभाग वाढविणे.
३) कायदेशीर नियंत्रण व दंडात्मक कार्यवाही करणे.
४) व्यसन मुक्तीसाठी उपचार समुपदेशन सेवा स्वयंसेवी संस्थामार्फत उपलब्ध करुन देणे.
५) सर्व शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, बाजार इत्यादी सर्व जागा तंबाखू व दारु मुक्त करण्यासाठी वातावरण निर्मिती करणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०४१७२२३१७५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay Hanumant Karanjekar

Digitally signed by Sanjay Hanumant Karanjekar
DN: CN = Sanjay Hanumant Karanjekar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Under Secretary
Date: 2016.01.06 16:10:42 +05'30'

(सं.ह.करंजेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री, सामाजिक न्याय खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मंत्री, महिला व बालविकास खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मंत्री, आदिवासी विकास, खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व मंत्रालयीन विभाग.
९. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स, मुंबई.
१०. जिल्हाधिकारी, गडचिरोली.
११. मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, गडचिरोली.
१२. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
१३. जिल्हा पोलिस अधिक्षक, गडचिरोली.
१४. उपायुक्त, अन्न व औषध प्रशासन, वांद्रे-कुर्ला कॉम्पलेक्स, मुंबई.
१५. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, गडचिरोली.
१६. जिल्हा शल्य चिकित्सक, गडचिरोली.
१७. जिल्हा आरोग्य अधिकारी, गडचिरोली.
१८. जिल्हा वन अधिकारी, गडचिरोली.
१९. जिल्हा कृषी अधिकारी, गडचिरोली.
२०. जिल्हा शिक्षण अधिकारी, गडचिरोली.
२१. डॉ. अभय बंग, सर्च संस्था, शोधग्राम, धानोरारोड,गडचिरोली.
२२. तंबाखू व दारुबंदी या क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी (३).
२३. सर्च या संस्थेचे प्रतिनिधी.